सातारा सैनिकी शाळेच्या नूतनीकरणासाठी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात रु. १८.०० लक्ष इतका निधी वितरीत करण्यासाठी प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन निर्णय क्रमांकः .सासैशा-२०१७/प्र.क्र. ६७/एसएम-६

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक

मंत्रालय , मुंबई - ३२

तारीख:- ६ मार्च , २०१८

वाचा -

१) शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक यांचे पत्र क्र. सासैस्कू/२०१७ /१४३८४/ ३०३/४५१४, दिनांक १६.८.२०१७

२) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सातारा यांचे पत्रा क्र. प्रकल्प- २/५२७६/२०१७, दिनांक १३.७.२०१७

३) शासन परिपत्रक क्रमांकः पूरक २०१७/प्र.क्र.९९/ अर्थसंकल्प-३, वित्त विभाग, दिनांक ३०.६.२०१७

४) शासन निर्णय क्रमांकः .सासैशा-२०१७/प्र.क्र. ६७/एसएम-६, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, दिनांक १६.१.२०१८

५) शासन निर्णय क्रमांक: अर्थसं-२०१७/प्र.क्र. ७५/अर्थ-३, वित्त विभाग, दिनांक ६.२.२०१८

प्रस्तावना :-

सातारा सैनिकी शाळेची स्थापना दि. २३ जून १९६१ रोजी झाली असून ही देशातील पहिली सैनिकी शाळा आहे. महाराष्ट्रातील तळागाळातील व सर्व स्तरावरील गरीब व होतकरू मुलांना राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या माध्यमातून भारतातील सैन्य दलात अधिकारी पदावर संधी मिळावी, हा या शाळेचा मुख्य उद्देश आहे.

सातारा सैनिक शाळेचा परिसर ११५ एकर सरकारी जमिनीमध्ये आहे. या परिसरातील काही इमारती ब्रिटीश काळातील १९२१ ते १९६१ मधील असून काही इमारती सन १९६१ मध्ये सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत बांधण्यात आलेल्या आहेत. त्यांचे बांधकाम जुन्या पध्दतीचे असून सदर इमारती धोकादायक झालेल्या आहेत. सातारा सैनिक स्कूल नियमावलीतील नियम क्र. १५.०४ नुसार, तसेच दिनांक ३०.१२.२०१६ रोजी झालेल्या सामंजस्य करारानुसार सातारा सैनिक शाळेच्या इमारत देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी राज्य शासनाची आहे.

सबब, सातारा सैनिक शाळेच्या नूतनीकरणासाठी रु. ११४.८५ लक्ष इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास संदर्भाधीन क्र. (४) च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता दिली आहे. सातारा सैनिक शाळेच्या नूतनीकरणासाठी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात खर्च करण्यासाठी एकूण अंदाजपत्रकापैकी रु. २०.०० लक्ष (रुपये वीस लक्ष फक्त) इतका निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

सातारा सैनिक शाळेच्या नूतनीकरणासाठी "मागणी क्रमांक ई-२, २२०२-सर्वसाधारण शिक्षण, ०२ माध्यमिक शिक्षण-११०, अशासकीय माध्यमिक शाळांना सहाय्य (००)(०३) पूर्वाध्ययन सैनिकी शाळांना सहायक अनुदान (२२०२ ०४६९), ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर)" या लेखाशिर्षाखाली सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात खर्च करण्यासाठी संदर्भाधीन क्र. (५) च्या शासन निर्णयानुसार रु. २०.०० लक्ष (रुपये वीस लक्ष फक्त) इतक्या मंजूर तरतूदीपैकी ९०% निधी म्हणजेच रु. १८.०० (रुपये अठरा लाख फक्त) वितरीत करण्यास शासनाची मंजूरी देण्यात येत आहे.

२. सदर निधी वितरीत करण्यासाठी आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. तसेच सहायक संचालक (लेखा) माध्यमिक व उच्च माध्यमिक, शिक्षण संचालनालय, पुणे यांना या शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात येणा-या निधीकरीता आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

३. वित्त विभागाने निर्गमित केलेल्या विविध मार्गदर्शक सूचनांचे, वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक :- अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक १८.४.२०१७ व क्रमांक अर्थसं-२०१७/प्र.क्र. ९४/अर्थ-३, दिनांक ३०.६.२०१७ च्या परिपत्रकातील आदेशांचे काटेकोर पालन करणे आवश्यक राहील.

४. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ३७/अर्थ-८, दिनांक २३.२.२०१८ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०३०६१३००३८०४२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Swati Madhukar Nanal

Digitally signed by Swati Madhukar Nanal
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=82e1d6f07c5cabf5884958ee70015d36b35b2c07e9700fe62cba2439a81b4be4, serialNumber=007d84f8ce44beba86b0ca2d0155d67cc1a9db4f8d59bc9d8067628d62bcdc1a, cn=Swati Madhukar Nanal
Date: 2018.03.06 13:01:51 +05'30'

(स्वाती नानल)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव
२. प्रधान सचिव, (शालेय शिक्षण)मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक
३. आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे
४. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे

५. सहायक संचालक (लेखा), माध्यमिक व उच्च माध्यमिक, शिक्षण संचालनालय, पुणे
६. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, सातारा.
७. महालेखापाल(लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई
८. प्रधान महालेखापाल(लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई
९. जिल्हा कोषागार अधिकारी, सातारा.
१०.वरीष्ठ कोषागार अधिकारी, पुणे.
११.प्राचार्य, सैनिकी स्कूल, सातारा
१२.सचिव, संरक्षण मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली.
१३.मानद सचिव, बोर्ड ऑफ गव्हर्नर सैनिकी स्कूल, नवी दिल्ली.
१४.कार्यासन अधिकारी (अर्थसंकल्प) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५.वित्त विभाग,व्यय-५/अर्थसंकल्प-३ मंत्रालय,मुंबई-३
१६.निवड नस्ती (एसएम-६)